# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

**शैक्षणिक वर्ष २०१७–१८ मध्ये शिकत असलेल्या अनु. जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रलंबित शिष्यवृत्तीचे अर्ज सादर करणेबाबत.**

विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयामध्ये अनुदानित/विनाअनुदानित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या अनु. जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०१७–१८ मध्ये शिष्यवृत्ती/फ्रिशिप साठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केलेले आहेत. सदरचे अर्ज महाविद्यालयाकडून पडताळणी करून शासनाकडे पाठविण्यात येतात. तरी, काही महाविद्यालयांनी महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज अद्यापही शासनास पाठविलेले नसल्याचे शासन पत्र जा. क्र. भासशि–१२१५/प्र.क्र. का.१(४)/३०३० दि. ०६/०६/२०१८ अन्वये कळविलेले आहे. सोबत शासन पत्राची प्रत जोडत आहे.

तरी, या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती/फ्रिशिप प्रतिपुर्ती मिळण्यासाठी महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेल्या अर्जांची पडताळणी करून शासनाकडे त्वरीत सादर करण्यात यावेत.

उपकुलसचिव,<br>
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे – ७<br>
संदर्भ : शै. प्रवेश/२०२१<br>
दिनांक : ११/०६/२०१८

प्रत:

मा. प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/संस्था.

# प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
## घोडेगांव ता. आंबेगांव जि . पुणे

महाराष्ट्र शासन

नविन प्रशासकीय इमारत घोडेगांव ता. आंबेगांव जि. पुणे

दुरध्वनी क्रमांक- ०२१३३-२४४२६६ फॅक्स क्र. ०२१३३-२४४२७७

ई मेल- poghodegaon@gmail.com


---

वाचा-१.शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.आस्था-१०८९/प्र.क्र.७९९/का.१५, दि.१५ जानेवारी,१९९२.

२. मा. आयुक्त आदिवासी विकास (म.रा) यांचेकडील पत्र क्रमांक शिष्यव-२०१७/प्र.क.४४/का.६(९) दि. २७ एप्रिल २०१८

---

जा.क्र.भासशि-१२१५/ प्र.क्र. का.१(४) 3030 दिनांक- ०६/०६/२०१८.

प्रति,
मा.कुलगुरू
सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
पुणे

विषय:-सन २०१७-१८ या वर्षात प्रलंबीत असलेले भारत सरकार शिष्यवृ.त्ती अर्ज प्रस्ताव महाविद्यालयाकडून सादर करणे बाबत.

महोदय

या कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या पुणे, जिल्हयातील अनुसूचित जमातीचे विद्यार्थी अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत आहेत. अनुसूचित जमातीचे विद्यार्थ्यानी ऑन लाईन शिष्यवती मिळणे बाबत अर्ज महाविद्यालयास सादर केलेले आहेत. परंतु महाविद्यालयाने या कार्यालयाकडे विद्यार्थ्यांचे सन २०१७ -२०१८ (सोबत महाविद्यालयाची यादी) अर्ज प्रस्ताव सादर केले नसल्याने विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असल्याचे शासनाच्या संदर्भ क्रं २ अन्वये निदर्शनास आले आहे. याबाबत कार्यालयाकडून गहपाल व अधिक्षक यांचेकडून वारंवार महाविद्यालयांना भेट देवून अहवाल मागविण्यात आले होते. तरीही आजअखेर महाविद्यालय स्तरावर ९६५ अर्ज प्रलंबित आहेत. याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडून नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

शिष्यवृती वेळेत न मिळाल्याने विद्यार्थी, पालक व संघटना यांनी या कार्यालयाकडे/विभागाकडे वारंवार विचारणा करीत आहेत. त्याकरीता सोबतच्या प्रलंबित महाविद्यालयांची यादी नुसार संबधित महाविद्यालयातील प्रलंबित प्रकरणे महाविद्यालय लॉगीनवरुन या कार्यालयाच्या लॉगीनवर ऑन लाईन सादर करणे बाबत आपले स्तरावरुन संबेधित महाविद्यालयांना कळविण्यात यावे.

सोबत –शिष्यव.त्ती प्रलंबित असलेल्या महाविद्यालयाची यादी .

आपले विश्वासू

सहाय्यक जिल्हाधिकारी
तथा
प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
घोडेगांव ता. आंबेगावं जि. पुणे